ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केल्याने शिक्षा अंतिम करणे बाबत. (श्रीम.कविता भास्कर शिंदे, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत-चिलेखनवाडी, ता.नेवासा)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/2८9020 /२०२६
दिनांक-स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

संदर्भ :- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र/ज्ञापन क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/६५७/२०२२ दिनांक २२/०८/२०२३

२. सहा.आयुक्त (चौकशी), नाशिक यांचेकडील चौकशी अहवाल क्र. विशा.४/खाचौ/सी.आर.११०/२०२३ दिनांक २०/०६/२०२४

३. विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील परिशिष्ठ ७.१

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम ९६४ मधील नियम ४ (२)

५. या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्र.ग्रापं-३/५७८०८४/२०२४ दिनांक १२/०९/२०२४

६.गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/८१८/ २०२४,दि.१६.१०.२०२४ नुसार श्रीम.कविता भास्कर शिंदे यांनी सादर केलेला खुलासा दिनांक १५/१०/२०२४

ज्याअर्थी श्रीम.कविता भास्कर शिंदे, तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत,चिलेखनवाडी ता.नेवासा यांनी ग्रामपंचायत कार्यालीयन कामी गैरवर्तन केले असलेने संदर्भ क्र.१ अन्वये त्यांना दोषारोपपत्र बजावणेत आले होते. संदर्भ क्रमांक ०२ नुसार प्रकरणी विभागीय चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला असुन त्यांचे वर गैरवर्तना बाबत एकूण ०४ दोषारोप ठेवण्यात आलेले होते. त्यापैकी १ ते ३ आरोप विभागीय चौकशी मध्ये अंशत: सिध्द झालेले आहेत व आरोप क्रमांक ०४ सिध्द झालेला नाही, विभागीय चौकशी नियम पुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात मधील ७.१ नुसार चौकशी अहवालास शिस्त विषयक प्राधिकरण सहमत असल्याने व श्रीम.कविता भास्कर शिंदे यांनी जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार त्यांना तीन वेतनवाढ कायमस्वरुपी थांबविण्याची शिक्षा का करणेत येऊ नये ?, याबाबतची अंतिम कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्याबाबतचा खुलासा

दहा दिवसाचे आत सादर करणे व दिलेल्या मुदतीत खुलासा प्राप्त न केल्यास नोटीस मधील शिक्षा तुम्हांस मान्य आहे,असे गृहीत धरुन पुढील कार्यवाही करण्यात येईल नमुद करण्यात आलेले होते. संदर्भ क्रमांक ०६ अन्वये श्रीम.कविता भास्कर शिंदे, ग्रामसेवक त्यांनी याप्रकरणी खुलासा सादर केलेला आहे. श्रीम.कविता भास्कर शिंदे यांचे खुलाश्याचे अवलोकन करता प्राप्त खुलासा प्रशासकीय दृष्टया असमर्थनिय ठरत असल्याने, अमान्य करण्यात येत आहे.

त्याअर्थी, मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशान्वये श्रीम.कविता भास्कर शिंदे, तत्कालीन ग्रामसेवक, ग्रामपंचायत चिंलेखनवाडी ता.नेवासा यांना पुढील वेतनवाढ भविष्य-कालिन वेतनवाढीवर परिणाम होईल,असारितीने एकवर्षाकरिता शिक्षा अंतिम करीत आहे. या आदेशाची नोंद संबधिताचे सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६०२१९०६००४२ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 19-02-2026 16:39:06
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. श्रीम.कविता भास्कर शिंदे,तत्कालीन ग्रामसेवक ग्रामपंचायत चिलेखनवाडी ता.नेवासा
द्वारा व प्रत-गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव

२/- सदरची नोटीस संबंधितास बजावून बजावले बाबतची तारखेसह स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास तात्काळ सादर करावी.

२. गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांना पुढील कार्यवाही साठी रवाना